महाराष्ट्र शासन

बैठकीचे इतिवृत्त
दि.१७.०४.२०१३ रोजी दुपारी १.०० वा.

क्र.एबाविं-२०१२/प्र.क्र.४०९/का.६
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दूरध्वनी ०२२-२२७९३९२४
फॅक्स ०२२-२२८२८२८१
Email - icdsd6@gmail.com
दिनांक :- १४ मे, २०१३

प्रति,

१. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
३. श्री. अवधूत राणे, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीज, मेकर भवन II, ४ था मजला, ऑफिस नं.१८, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, हिकर भवनजवळ, आयकर भवनच्या पाठीमागे, बलवास रेस्टॉरन्टजवळ, मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०.
४. विभागीय उपआयुक्त, **मुंबई विभाग,** महिला व बाल विकास विभाग,
५. श्री. डी. जी. मुंढे, उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
६. श्रीमती वृषाली नाईक, मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई
७. श्रीमती वृषाली पिसपाटी, चिफ एक्सिकेटिव्ह ऑफीसर, मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई १ ला मजला, अब्बास बिल्डिंग, मेरेवेदर रोड, कुलाबा, मुंबई - ४०० ००१

**विषय :- मुंबई शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईटवर पाळणाघर/अंगणवाडी सुरु करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास, यांचे दालनात **दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे कार्यवृत्त माहिती तथा पुढील उचित कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(दि. बा. पाटील)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

९) मा. प्रधान सचिव (म. व बा. वि.) यांचे वरीष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०) उप सचिव (म. व बा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

विषय :- मुंबई शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईटवर पाळणाघर / अंगणवाडी सुरु करणेबाबत मा. प्रधान सचिव (म. व बा. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी व संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

| अ. क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. ब. बा. चव्हाण | उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, |
| २ | श्री. अवधूत राणे | महाव्यवस्थापक, एम.सी.एच.आय. मुंबई |
| ३ | श्रीमती वृषाली नाईक | Prog. Co-ord., मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई |
| ४ | श्री. प्रदीप शिंदे | समन्वयक, मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई |
| ५ | श्री. राजेंद्र सोनवणे | सहाय्यक विस्तार अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ६ | सौ. स्ने. रा. गोडबोले | बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुलुंड, मुंबई |

बैठकीच्या सुरवातीला श्री.अवधूत राणे, महाव्यवस्थापक, एम.सी.एच.आय. मुंबई यांनी असे सांगितले की, तात्पुरती अंगणवाडी सुरु करण्यासाठी MCHI CREDAI यांचेकडून फोल्डिंग तंबू (Mobile Tent) देणगी स्वरुपात देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून MCHI CREDAI यांची नवीन कमिटी स्थापन झालेली असून अद्याप त्यांच्याकडून मान्यता मिळालेली नाही.

श्रीमती वृषाली नाईक, मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई यांनी असे सांगितले की, मुंबई मोबाईल क्रेशज, यांच्याकडून चालविण्यात येत असलेल्या २७ ठिकाणीची केंद्रांपैकी आतापर्यंत ६ ठिकाणच्या केंद्रावर एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत आहार देण्यात येतो. त्यामुळे उर्वरित २१ केंद्रावरही आहार देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच राज्यात विशेषत: मुंबई व ठाणे परिसरात जेथे इमारतीचे बांधकाम सुरु आहे तेथे तसेच पादचारी मार्ग व पुलाखाली जी मुले राहतात त्या मुलांचे भविष्य उज्ज्वल होण्याकरीता व सदर मुले वाम मार्गाला लागू नये म्हणून त्यांना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे फायदे मिळण्यासाठी तात्पुरती पाळणाघर / अंगणवाडी सुरु करुन तेथील मुलांची नांवे जवळ असलेल्या अंगणवाडीच्या रजिस्टर्समध्ये नोंद घेऊन त्या मुलांना पूर्व प्राथमिक अनौपचारिक शिक्षण व आहार देण्यासाठी आदेश निर्गमित करावेत, असे निदेश मा. प्रधान सचिव, यांनी दिले.

श्री. राजेंद्र सोनवणे, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी असे सांगितले की, पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात विकासकाला नवीन बांधकामे परवाने देताना बांधकामावरील मजूरांच्या मुलांकरीता कम-डे केअर सेंटर (पाळणा घर) सुरु करण्यासाठी पुरेशी जागा देणे बंधनकारक करुन परवान्यामध्ये तशी अट ठेवण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असून अद्याप निर्णय झालेला नाही.

शेवटी मा.प्रधान सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सर्व बाबी पूर्ण करुन माहे जून, २०१३ मध्ये बैठक आयोजित करण्याचे सूचित करुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

* * * * *